# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## <u>कार्यपत्रिका क्रमांक ४८</u>

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १२/२/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

### मा.सभासदांचा प्रस्ताव

**विषय क्र. २४६८**

मा.विशाल धनवडे व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.६/२/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे मिळकत कराची थकबाकी मोठया प्रमाणात आहे. ही थकबाकी वसुल होण्यासाठी आणि पालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी मिळकत कर अभय योजना राबवावी.

**विषय क्र. २४६९**

मा.सौ.रुपाली धाडवे व मा.सौ.श्वेता गलांडे–खोसे यांचे दि.६/२/२०१९ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १०५० दि. ५/९/२०१८ चा फेरविचार करुन सदर ठरावातील नविन सुचविलेल्या कामामधील अ.क्र. २० प्रभाग क्र. ३७ ब बालाजी मार्केट समोरील जागेत मार्केट उभारणे र.रु. १० लाख या कामाऐवजी प्रभाग क्र. ३७ ब मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे र.रु. १० लाख अशी दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २४७०**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ जानेवारी २०१९ ते दि.३१ जानेवारी २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/१२९९ दि.५/२/२०१९ चे पत्र.

### सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २४७१**

मुंढवा येथे मुळा–मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सॅन्डफिल्ड (इंडिया) लिमिटेड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,७६,५४,८१०=७९ पेक्षा १४.४९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.७,७४,५७,९९२=८७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जीएसटी र.रुपये ९२,९४,९५९=१४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २,०४,६५०/– अदा करणेस व टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१२९१ दि. ४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २४७२**

हडपसर येथे नियोजित विठ्ठलराव तुपे उद्यान येथील उर्वरीत स्थापत्यविषयक कामे पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर्यन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,९१,०११/– पेक्षा १७.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३६,४४,१००=०२ पर्यंत काम करून घेणेस तसेच त्यानुसार जी.एस.टी. र.रुपये ४,३७,२९२/– व रॉयल्टी चार्जेस र.रुपये ६०,७७६=२० अधिक टेस्टिंग चार्जेस र.रुपये २१,२०८/– अदा करणेकरीता तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१३०७ दि.५/२/२०१९ चे पत्र.

विषय क्र. २४७३

Supply, Installation, Testing and Commissioning of Electromechanical Equipments at 5 TPD Bio methanataion Plants installed across the Pune City कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.मेलहेम आयकोस एनव्हायरोन्मेंट प्रा.ली. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९३,५५,६६६/- पेक्षा ५.०१३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८८,८६,६६६=४६ पर्यंतची निविदा प्राप्त झालेली असून त्यांचेकडून काम करून घेणेस, त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,८२,७३४/- अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./१३०८ दि.६/२/२०१९ चे पत्र.

विषय क्र. २४७४

पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रभागांसाठी विविध सभासदांकडून क्षेत्रीय कार्यालयामार्फत प्राप्त मागणीनुसार स्टील बेंच पुरविणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या 13 निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.पायल इंडस्ट्रीज, पुणे यांचेकडून खालील कोष्टकानुसार रक्कम रुपये - 3,91,86,000/- (<u>अक्षरी रक्कम रुपये</u> - तीन कोटी एक्कयाण्णव लक्ष शहाऐंशी हजार मात्र) (सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१३०९ दि.६/२/२०१९ चे पत्र.

**<u>मे.पायल इंडस्ट्रीज, पुणे.</u>**

| अ. क्र. | मालाचा तपशिल | परिमाण | संख्या | दर ( प्रति नग ) | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Public Place Seating Chair (Steel Bench) | नग | 7000 | 5,598 | 3,91,86,000/- |
| **<u>अक्षरी रक्कम रुपये</u> - तीन कोटी एक्कयाण्णव लक्ष शहाऐंशी हजार मात्र ( सर्व करांसह )** | | | | | 3,91,86,000/- |

### मागील सभेचे विषय

विषय क्र. २४७५

प्रभाग क्र. २७ ड मध्ये साईबाबानगर मध्ये अर्धवट असलेले बहुउद्देशीय हॉलचे काम पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.माणिक रामचंद्र बाबर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,७८,२५५=९० पेक्षा ७.११% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९५,०९,४९९=८९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६५,३९०=७१ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये५४,१८०/- पुर्वगणनपत्रक रकमेपर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२०२ दि.२४/१/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. २४७६

प्रभाग क्र. ३१ अ व ड येथील राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझा धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसित करुन सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,५७,०२,८१७/- पेक्षा ८.५७% जास्त (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,७९,०५,५४८=४२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये३३,४८,६६५=८१ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,८०,९१५=२० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २,४०,४५९/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१२५० दि.२९/१/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४७७**

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे समन्वयाने पुणे शहर हद्दीमध्ये जाहिरात धोरण राबविणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेने दिलेल्या मान्यतेचा फेरविचार होणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आकाशचिन्ह/९३२ दि.३१/१२/२०१८ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४७८**

पुणे पेठ कोथरुड स.नं. १४७, हि.नं.२+१अ व २/ब+३+४+५/अ येथील PMPML & ST साठी आरक्षित असलेली ९ आर व १८ आर क्षेत्र जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/६४८ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४७९**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे या कामास सन २०१८-१९ साठी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी असल्याने वर्गीकरणाद्वारे या कामासाठी र.रुपये ४६० लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तद्नुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | ४,६०,००,००० | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे या कामाअंतर्गत बजेट हेड (CE20D170/L1-) मधील अ.क्र.५ अलंकार थिएटर जवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे | ---- | ४,६०,००,००० |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४८०**

पुणे मनपाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकतील शिल्लक राहणाऱ्या रकमेतून पुणे महानगरपालिकेच्या सेवक व निवृत्त सेवक यांचे वैद्यकीय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपूर्तीसाठी र. रु. ५,००,००,०००/- (अक्षरी :- पाच कोटी फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९५ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | ५,००,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F153 D, ब२. मनपा सेवकांसाठी रिएम्बर्समेंट | ---- | ५,००,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४८१**

मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या टेंडर क्रमांक ४५ सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मधील मान्य ठेकेदार श्री एंटरप्राईजेस व दिशा एजन्सी यांचेकडून अनुक्रमे कमला नेहरू रूग्णालय व १.राजीव गांधी हॉस्पिटल २.जयाबाई सुतार हॉस्पिटल ३.डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालय ४.सोनावणे हॉस्पिटलकडील अंर्तगत व बाहय परिसराची जंतुनाशकासहित

यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे काम पुढील पाच महिने मुदतीकरीता (ऑक्टोबर २०१८ ते मार्च २०१९पर्यंत) करणेकामी रक्कम रूपये २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त ) पर्यंत वर्गीकरणाव्दारे आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस,बिलांची रक्कम अदा करणेस तसेच वाढीव औषधे खरेदी करणेकामी र. रु. २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९६ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | २,६५,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F140B, कमला नेहरु रुग्णालयांकडील व इतर रुग्णालय येथे विविध सेवक वर्ग ठेकेदार पध्दतीने नेमणे | ---- | २,६५,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.५/२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २४८२**

पुणे महानगरपालिका हद्दीतील रस्ता दुभाजक, वाहतुक बेटे, उद्याने यांचे सुशोभिकरण, देखभाल, दुरूस्ती व वृक्षारोपण इ. कामाकरिता एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस्ट (III) अंतर्गत मा. बी.ओ.टी समिती मध्ये मान्य झालेल्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र. ८ व ९ अन्वये खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२५८ दि. ३१/१/२०१९ चे पत्र.

१) मा. बी.ओ. टी समितीने मान्यता दिलेल्या मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र. १ मधील प्रायोजकांच्या प्रस्तावावर कार्यवाही करणेस,

२) मा. बी.ओ.टी समितीने मान्य केलेल्या प्रायोजकांच्या प्रस्तावास कामांचे कार्यादेश (वर्कऑर्डर) देणेस व प्रायोजकांसमवेत करारनामा करणेस,

३) मा. बी.ओ.टी समितीने मान्य केलेल्या प्रायोजकांकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र. २ मध्ये उल्लेखित सुरक्षा अनामत रक्कम स्विकारणेस,

४) मा.बी.ओ.टी समितीने मान्यता दिलेल्या मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र. १ मधील विषयपत्र क्र. १५ मधील प्रायोजकांस मातोश्री रमाई भिमराव आंबेडकर उद्यानास प्रवेश शुल्क प्रौढांसाठी र.रु. १०/- व लहानांसाठी र.रु. ५/- स्विकारणेस,

**विषय क्र. २४८३**

मे.औद्योगिक न्यायालय, पुणे आणि मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे पालन करणेसाठी तक्रारदार माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक या अस्थायी पदावर सहा महिनेसाठी करार पध्दतीने सेवा घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/१२८० दि.४/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २४८४**

पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागाकडील सन २०१८-१९ चे क अंदाजपत्रकातील महसूली भांडवली कामातील शिल्लक रक्कमेतुन - पाणी पुरवठा भांडवली, महसुली मलनि:सारण कामे करणे करिता र.रुपये १४६४.०० लक्ष वर्गीकरणाने उपलब्ध होणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२९४ दि.५/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २४८५**

चंदननगर स.नं.५० पुणे महानगरपालिकेच्या जागेत बहुउद्देशिय हॉल सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेल्या व महिला करिता मोफत प्रशिक्षण म्हणजेच शिवण क्लासेस, ब्युटी पार्लर कोर्स इ. देणा-या कल्पवृक्ष महिला उन्नती केंद्र या सामाजिक संस्थेस १५०० चौ.फुट हॉल नाममात्र १ रू. रकमेने ५ वर्षाकरिता देण्याबाबत मा.ॲड.भैयासाहेब जाधव व विशाल धनवडे यांचे दि.८/१/२०१९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.३६६ दि.१०/१/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र. २४८६**

प्रभाग क्र १३ एरंडवणे-हॅपी कॉलनी मधील नेचरवॉक चॅरीटेबल ट्रस्ट ही संस्था गेले अनेक वर्षांपासून निसर्ग संवर्धनाचे,पर्यावरण रक्षणाचे काम करीत आहे.सदर संस्थेमार्फत पर्यावरण रक्षाणाचे अनेक कार्यक्रम राबविले जातात.याच प्रमाणे लहान मुले,महिला,जेष्ठ नागरीक यांच्या समावेत विविध पर्यावरण संर्वधनाचे,त्याबाबत जनजागृतीचे कार्यक्रम,चर्चासत्रे,शिबीरे विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.तसेच मुलांमध्ये निर्सग विषयक आवड निर्माण होण्यासाठी त्यांना लेकचर्सचे,सहलींचे आयोजन करीत असत.यामुळे सदर संस्थेची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून अनेक नागरिक,मुले,जेष्ठ नागरिक या संस्थेमार्फत घेण्यात येणा-या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत आहे.परंतु कार्यालीन जागेअभावी यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत.

आमचे प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार व मुलांसाठीच्या गरजेनुसार प्रभाग क्र १३ मधील योग केंद्र व मुलांसाठी वाचनालय याकरिता बांधण्यात आलेल्या इमारतीमधील १८० चौ.फुट क्षेत्राफळाचे हॉल कायमस्वरुपी देणे गरजेचे आहे.

तरी सदर भागांतील नागरिकांच्या मागणीनुसार व जागा वाटप नियमावाली २००८ नुसार संयुक्त प्रकल्पातील भाग १० अनुक्रमांक १ नुसार या हॉलचे क्षेत्रफळ १५०० चौ.फु. पेक्षा कमी आहे.म्हणून पुणे मनपा व नेचरवॉक चॅरीटेबल ट्रस्ट यांस वापरण्यास देण्यास मान्यता देणेस व नियमानुसार संयुक्त प्रकल्प म्हणून करारनामा करण्यास व स्वामित्वापोटी वार्षिक १ रुपया नाममात्र भाडे भरण्यास करारनाम्यात किमान ५ वर्षांची मुदत नमुद करण्यास करारनाम्यातील अटी व शर्तीचे संस्थांनी काटेकोरपणाने पालन करणेस मान्यता देण्याबाबत मा. सौ.मंजुश्री खर्डेकर व मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि. १४/१२/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८८ दि.२५/१/२०१९ विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**